# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका तर्फे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत बूटकॅम्पमध्ये रोजगार इच्छुक उमेदवारांना विशेष प्रशिक्षण.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य शासनाची नुकताच जाहीर झालेली मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत बूटकॅम्प (First step in job market) याचे आयोजन 13 सप्टेंबर दुपारी 3.00 वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन) भाईंदर (प.) येथे करण्यात आले होते. टेक महिंद्रा फाउंडेशन, मिरा भाईंदर महानगर पालिकेतील innovation cell आणि समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या बूटकॅम्प या प्रशिक्षण कार्यशाळेत 100 रोजगार इच्छुक उमेदवार सहभागी झाले होते.

या बूटकॅम्प प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये श्रीम. दिपाली जोशी (समाज कल्याण विभाग अधिकारी) यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने संदर्भात सखोल माहिती दिली तर श्रीम. कल्पिता पिंपळे (उपायुक्त) यांनी बूटकॅम्प प्रशिक्षण कार्यशाळेच्या संदर्भात माहिती देत या प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेतल्याबद्दल आभार मानून उपस्थित सर्व रोजगार इच्छूक उमेदवारांनी सदर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने संदर्भात जनजागृती करणेबाबत व या योजनेत इतर युवक युवतींना सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणेबाबत विनंती केली. भविष्यात मिरा भाईंदर शहरातील रोजगार इच्छूक उमेदवारांनी पुढच्या होणाऱ्या बूटकॅम्प (first step in job market) या प्रशिक्षण कार्यशाळेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा जेणेकरून भविष्यातील रोजगाराचा प्रश्न मार्गी लागुन मिरा भाईंदर शहरातील रोजगार इच्छूक उमेदवार सक्षम होतील आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेने आयोजित केलेल्या या बूटकॅम्पचा (first step in job market) हेतू साध्य होईल अशी भावना मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांनी व्यक्त केली.